महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
रविराज क्रु मॉल इमारत, बिबवेवाडी कोंढवा रोड, बिबवेवाडी, पुणे ३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. – 020-25506958
जा.क्र. शामअ/४१ दि.- १५/०६/२०१७

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक – १४/०६/२०१७ दिनांक – दुपारी ०४.०० वा.

स्थळ – महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, रविराज क्रु मॉल इमारत, बिबवेवाडी कोंढवा रोड, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,
**श्री. दिनेश खराडे**
सोनाई, घर क्र.४६४, चाळ क्र.५९,
महर्षिनगर, पुणे ४११०३७. } **अपिलार्थी**

**श्री.मु.म.शेख**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } **जनमाहिती अधिकारी तथा** उप अभियंता

### माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री.दिनेश खराडे (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक ०१/०३/२०१७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक ०१/०३/२०१७ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी दि.०१/०४/२०१४ ते दि.२७/०२/२०१७ पर्यंत कनिष्ठ अभियंता निवदेकर यांचे सहिने अदा झालेल्या निविदा कामांच्या मेजरमेंट बुकची झेरॉक्स प्रत, निविदा कामांची यादी, सर्व निविदा प्रकरणे पहावयास मिळणेस तसेच श्री.निवदेकर यांचे सेवापुस्तिकेची झेरॉक्स प्रतीबाबतची माहिती विचारलेली होती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| ०१/०३/२०१७ | ०१/०३/२०१७ | ३०/०३/२०१७ | --- | ७६ दिवस |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती विहित मुदतीत न मिळाल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक १८/०५/२०१७ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| १८/०५/२०१७ | १८/०५/२०१७ | अपिल अर्ज मुदतीत नाही. परंतु अपिलार्थीने माहिती मिळविणेसाठी जनमाहिती अधिकारी यांचेकडे ४ ते ५ वेळा व्यक्तिश: संपर्क साधूनही माहिती न मिळाल्याने अपिल अर्ज दाखल करणेत आला आहे. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक १४/०६/२०१७ रोजी दुपारी ०४.०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.दिनेश खराडे हे उपस्थित होते. तसेच जनमाहिती

अधिकारी श्री.मु.म.शेख हे आजारी असल्याने रजेवर होते. सहाय्यक जनमाहिती अधिकार तथा कनिष्ठ अभियंता श्री.शशिकांत निवदेकर व या कार्यालयाकडील उप अधिक्षक श्री.सुरेंद्र वाळके हे उपस्थित होते.

वरीलप्रमाणे संबंधित सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे .

<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'</u>

- जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थींच्या माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या कालावधीतील माहितीपैकी सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या कालावधीतील कामांच्या मेजरमेंट बुकच्या झेरॉक्स प्रती व एमआयएस (कामांची यादी) तसेच अपिलार्थी श्री.दिनेश खराडे यांच्या मागणीनुसार कार्यालयात उपलब्ध होणारी निविदा प्रकरणे पुढिल ६० दिवसात अपिलार्थी यांच्याशी संपर्क साधून अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी. श्री.निवदेकर यांच्या सेवापुस्तकाच्या प्रतीची आवश्यकता नसल्याचे अपिलार्थी यांनी सांगितल्याने सेवापुस्तकाची प्रत देणेत येवू नये. तसेच यापुढे माहिती अधिकारा अंतर्गत प्राप्त अर्जांची माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

15/06/17

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

प्रत –

१. श्री.दिनेश खराडे, सोनाई, घर क्र.४६४, चाळ क्र.५९, महर्षिनगर, पुणे ४११०३७.
२. श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.

<u>टिप –</u>

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे – ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.